

बापूजींच्या गोड गोष्टी

साने गुरुजी

भाग चार

साधना प्रकाशन

बापूजींच्या गोड गोष्टी

भाग चौथा

साने गुरुजी

साधना प्रकाशन
४३१ शनिवार पेठ,
पुणे ४११ ०३०
किंमत ६ रुपये

संपूर्ण संचाची किंमत ३० रुपये

प्रकाशकाचे प्रास्ताविक

'बापूजींच्या गोड गोष्टी' साने गुरुजींनी मुलांसाठी लिहिल्या आणि त्या लहानथोर सर्वांनाच अतिशय आवडल्या. या गोष्टींची बारा पुनर्मुद्रणे झाली, यावरून या 'गोड गोष्टीं'ची लोकप्रियता सहज लक्षात येईल.

१९९४ हे वर्ष म्हणजे गांधीजींच्या १२५ व्या जयंतीचे वर्ष! या शतकोत्तर रजतजयंतीला 'बापूजींच्या गोड गोष्टीं'चे पुन्हा एकवार मुद्रण करणे आवश्यक होते, औचित्याला धरून होते. म्हणूनच हे काम वर्षारंभीच साधना प्रकाशनाने तडीस नेले आणि सहाही भागांची पुनर्मुद्रणे वाचकांना, विशेषतः बालकुमारांना आनंदाने सादर केली.

मुलांचे मनोरंजन करणे म्हणजे देवाशी नाते जोडणे असे गुरुजी मानीत. या 'गोड गोष्टी' मनोरंजक तर आहेतच, पण अतिशय उद्बोधकही आहेत. गुरुजींसारख्या सहृदय आणि गांधीजींच्या ठायी नितांत श्रद्धा असणाऱ्या थोर लेखकाने लिहिलेल्या या गोष्टी आजच्या घडीला फारच उपयुक्त आहेत, हितकारक आहेत. गांधीजींचे दर्शन घडवता घडवता मनावर उत्तम संस्कार करण्याची शक्ती त्यांच्यात आहे.

पूर्वीच्या काळी कहाणीच्या शेवटी फलश्रुती दिलेली असे : ती रीत पाळायची तर असे म्हणता येईल की या गोष्टी मनापासून वाचणाऱ्या वाचकांची मने द्वेषमत्सरापासून मुक्त होतील, विशाल होतील आणि त्यांची सहानुभूती व्यापक आणि डोळस होईल. गांधींजी म्हणजे गुरुजींच्या जीवनातील सूर्य. त्याच्या तेजावर आपली चिमुकली ज्योत चेतवण्याचा साधा, सोपा मार्ग गुरुजींनी महाराष्ट्राला दाखविला आहे.

या आधीच्या आवृत्त्यांना परोपरीने साहाय्य करणाऱ्या सुहृदांचे आम्ही ऋणी आहोत. याही पुनर्मुद्रणाच्या कामी ज्यांचा हातभार लागला आहे त्यांचेही मनापासून आभार!

कुमुद करकरे
साधना प्रकाशन, पुणे ३०

बारावी आवृत्ती जानेवारी १९९४ © साधना ट्रस्ट

प्रकाशक, मुद्रक : कुमुद करकरे, साधना ४३१ शनिवार पेठ, पुणे ३०

बापूजींच्या गोड गोष्टी

१

लंडनला १९३१ मध्ये गेल्यावर गांधीजी मिस म्युरियल लीस्टरकडे गरीब वस्तीत उतरले होते. म्युरियलबाई तत्पूर्वी एकदा हिंदुस्थानात आल्या होत्या. त्या वेळेस बापू साबरतीच्या आश्रमात होते.

'तुम्ही इंग्लंडला या ना.' त्या म्हणाल्या.

'कशाला येऊ? तुम्हांला शिकवण्यासारखं अजून माझ्याजवळ काही नाही. आमचा सत्याग्रहाचा प्रयोग यशस्वी होऊ दे, मग बघू.'

'परंतु आम्हांला शिकवायला या असं नाही माझं म्हणणं.'

'मग कशाला येऊ?'

'आमच्यापासून शिकायला या.'

गांधीजींच्या मुखावर आनंद फुलला. ते म्हणाले, 'खरंच, तिथं अनेकांना भेटता येईल. जॉर्ज डेव्हिस वगैरेंचे अनुभव विचारता येतील. यायला हवं खरं. येईन मी.'

‘छान. कधी याल?’

‘माझ्या शर्ती कबूल करा.’

‘सांगा तर खऱ्या.’

‘मँचेस्टरच्या गिरणीमालकांना इकडे कापड पाठवू नका म्हणून सांगा. पार्लमेंटच्या सदस्यांना आणि मंत्रिमंडळाला हिंदुस्थानला स्वराज्य देऊन टाका असं सांगा. तिसरी गोष्ट म्हणजे– ब्रिटिश सत्तेमुळं आमच्याकडे जिकडे तिकडे दारू फैलावली आहे. दारूच्या उत्पन्नातून तिथं शिक्षण दिलं जातं. हे पाप आहे. अफूचाही व्यापार हिंदुस्थानमध्ये ह्यांनी चालू ठेवला आहे. अफू वाईटच, परंतु दारू तिच्याहून वाईट. अफू खाणाऱ्यांचं नुकसान करते; दारू सर्व कुटुंबाचं. स्त्रियांचे हाल तर विचारू नका. म्हणून तिकडे जाऊन हिंदमधील दारू व अफू बंद व्हावीत असा प्रचार करा. या तीन गोष्टी करा. मग मी एक कोटी हिंदी लोकांच्या सह्या घेऊन स्वतःच्या खर्चानं विलायतेत येईन व हिंदी मताला मान द्या म्हणून सांगेन.’

‘मी शक्य ते करीन.’ म्युरियलबाई म्हणाल्या.’

नुकत्याच या भगिनी हिंदुस्थानात येऊन गेल्या. सेवाग्रामला गांधीजींच्या झोपडीत त्या उभ्या राहिल्या. ‘बापूंच्या शिवाय बापूंची झोपडी’ असे त्या म्हणाल्या. ‘इथं लहान मुलांना आर्यनायकम आणि आशादेवी शिकवीत आहेत. बापूंचा आत्मा

इथं आहे, सर्वत्र आहे.'

२

काँग्रेसच्या कार्यकारिणीची एकदा बैठक चालली होती. बराच वेळ बैठक चालली. लोक जरा चुळबूळ करू लागले होते. गांधीजींच्या लक्षात एकदम ती गोष्ट आली. ते म्हणाले, :

'आता चहा पिऊन या सारे. तुमची सर्वांची वेळ झाली असेल.'

'तशी जरूर नाही. आणखी काही वेळ बसू. मग पिऊ चहा.'

'वेळेवर सारं झालं पाहिजे. मागून काय उपयोग? तुम्ही तर बेचैन दिसत आहात. जा, या पिऊन; चहाचा का आग्रह हवा तुम्हांला?' गांधीजी हसून म्हणाले आणि सारे हसले. राष्ट्राचा पिता सर्वांची काळजी घेणारा. महादेवभाईंना एकदा रात्री खूप काम पडले, तर बापूंनी त्यांच्यासाठी चहा करून ठेवला! सरदार चहा घेणारे. परंतु ३२ साली येरवड्यास गांधीजींबरोबर असताना, बापू चहा घेत नसत म्हणून सरदारही घेत नसत. थोरांच्या थोर गोष्टी.

३

वेब मिलर हे एक अमेरिकन वार्ताहर. त्यांनी 'मला शांती मिळाली नाही.' (I FOUND NO PEACE) नावाचे एक पुस्तक लिहिले आहे. त्यात त्यांनी गांधीजींची एक सुंदर आठवण दिली आहे.

१९३१ मध्ये गांधीजी गोलमेज परिषदेसाठी विलायतेत गेले होते. एके दिवशी वेब मिलर त्यांना भेटायला आले. बरेच बोलणे झाल्यावर आपली सिगारेट ठेवण्याची डबी पुढे करून ते गांधीजींना म्हणाले, 'या डबीवर तुमचीही सही द्या.' त्या डबीवर लॉईड जॉर्ज, प्रसिद्ध फ्रेंच मुत्सद्दी क्लेमेंको वगैरे प्रसिद्ध व्यक्तींच्या सह्या होत्या. गांधीजींनी डबी हातात घेतली. उघडून पाहिली. हसून म्हणाले, 'सिगारेटची ही पेटी. धूम्रपानाविषयीची माझी मतं तुम्हांला माहीत असतीलच. माझं नाव तंबाखूनं झाकलं जावं हे मला कसं आवडेल? या डबीत सिगारेट कधीही ठेवणार नाही असं वचन द्याल तर मी सही करीन.'

वेब मिलर यांनी वचन दिले आणि गांधीजींनी सही दिली. त्या वेळेपासून तो अमेरिकन वार्ताहर त्या डबीत व्हिजिटिंग कार्डे ठेवी. तो लिहितो, 'अनेकांच्या सह्या डबीवर होत्या, परंतु गांधीजींची सर्वांत स्वच्छ आणि स्पष्ट होती.'

४

१९३१ मध्ये लंडनला असताना अमेरिकन वार्ताहरांनी गांधीजींना एकदा भेटायला आणि भाषण करायला बोलावले होते. गांधीजींनी आमंत्रण स्वीकारले. मीराबेनना बरोबर घेऊन ते गेले. गांधीजींसाठी शुद्ध शाकाहाराची व्यवस्था होती. गांधीजी बोलायला उभे राहिले. ते म्हणाले, 'वार्ताहरांनी संयम शिकणं अगत्याचं आहे. मी जे काही तुम्हांला सांगणार आहे ते खाजगी नाही किंवा नवीन नाही. परंतु तुम्हांला संयम शिकवायची मला इच्छा आहे. आजचा दिवस तुम्ही मौनाचा म्हणून पाळा: म्हणजे मी जे इथं बोलणार आहे ते कुठं लिहून पाठवू नका!'

सारे वार्ताहर तर लिहून घेण्याच्या इराद्याने जमलेले. निरनिराळ्या वृत्तपत्रांतून भाषणाचा अहवाल देता यावा म्हणून लेखण्या सरसावून आलेले. परंतु गांधीजींची विनंती त्यांनी मान्य केली आणि त्या अमेरिकन वार्ताहरांनी काहीही टिपून घेतले नाही किंवा काहीही प्रसिद्ध केले नाही.

५

त्या वेळेस गांधीजी आफ्रिकेतून लंडनला गेले होते. दक्षिण आफ्रिकेतून हिंदी लोकांची बाजू विलायती लोकांसमोर मांडण्यासाठी

ते गेले होते. एक दक्षिण आफ्रिका समिती त्यांनी तेथे स्थापिली. मोठमोठ्या लोकांच्या त्यांनी भेटीगाठी घेतल्या. ते वर्तमानपत्रांतून लिहीत. कोठे सभा असत. सारा दिवस, एवढेच नव्हे तर मध्यरात्रीपर्यंत काम चाले.

एका हॉटेलात ते उतरले होते. एके दिवशी दक्षिण आफ्रिका समितीची बैठक चालू होती. इतक्यात त्यांचे एक मित्र डॉक्टर जोशिया ओल्डफील्ड त्यांना भेटायला आले. गांधीजी बॅरिस्टर व्हायला गेले होते, त्या वेळेस जोशिया आणि ते एकाच घरात राहत होते. त्यांचा फार स्नेह.

जुना मित्र भेटायला आलेला पाहून गांधीजी बाहेर आले. थोडे बोलणे झाल्यावर ते डॉक्टरांस म्हणाले :

'माझा एक दात फार दुखतो आहे तो काढून टाकता का?'

डॉक्टर ओल्डफील्ड यांनी दात पाहिला. दात काढणे कठीण होते. ते म्हणाले, 'एखाद्या दंतवैद्याकडंच जायला हवं.' गांधीजी म्हणाले, 'मला वेळ नाही. इथल्या इथं पटकन काढलात तर मी फार आभारी होईन. बघा. कारण माझं सारं लक्ष या दाताकडं जातं आणि एकाग्र चित्तानं विचार करता येत नाही, काम करता येत नाही.'

डॉक्टर ओल्डफील्ड बाहेर गेले. दात काढण्याचा चिमटा त्यांनी कोठून तरी मागून आणला. जागा बधीर केल्याशिवाय

दात काढणे फार त्रासाचे होते. गांधीजींनी समितीच्या लोकांना थोडा वेळ थांबायला सांगितले. ते आपल्या निजण्याच्या खोलीत आले, आणि डॉक्टर दात काढू लागले. काढायला जड गेले. परंतु गांधीजी शांत होते. त्यांनी सारी वेदना मुकाट्याने सहन केली. हायहुय काही नाही. दात काढून झाला. थोडी मिनिटे शांत बसले. नंतर हळू आवाजात डॉक्टरांचे आभार मानून ते आपल्या कामाला पुन्हा निघून गेले.

६

गांधीजी जन्मजात वैद्य होते. शुश्रूषा करणे त्यांना फार आवडे. आरंभीआरंभी आजाऱ्यांची सेवा करणे हा त्यांचा छंद होता. परंतु स्वतःच्या आध्यात्मिक विकासासाठी पुढे त्यांना ती आवश्यक वस्तू वाटू लागली.

१९३० च्या डिसेंबर महिन्यात दिल्लीला व्हाइसरॉयांबरोबर महात्माजी वाटाघाटी करीत होते. सत्याग्रह सुरू होता. हजारो सत्याग्रही तुरुंगात होते. व्हाइसरॉयांबरोबर काही मुलाखती झाल्या परंतु तडजोडीची आशा दिसेना.

'जर शक्यता नसेल तडजोडीची तर इथं कशाला राहू? एकमेकांचा वेळ फुकट दवडण्यात काय अर्थ? खोटी आशा

काय कामाची? आपलं जमत नाही असं जनतेला मोकळेपणानं जाहीर करू या.' गांधीजी व्हाइसरॉयसाहेबांस म्हणाले.

'खरी परिस्थिती लोकांसमोर ठेवण्यात धैर्य आहे ही गोष्ट खरी. आपण मग सेवाग्रामला कधी जाल?' व्हाइसरॉयांनी विचारले.

'शक्य तर आजच संध्याकाळी. अर्थात मी तुमच्या स्वाधीन आहे. तुम्हांला माझी जरूर असेल तोवर मी राहू शकेन. परंतु जरूर नसेल तर जाऊ द्या मला सेवाग्रामला. माझं हृदय तिथं आहे. किती तरी आजारी लोक तिथं आहेत. माझ्या सहकाऱ्यांपैकी बरेचसे ते आहेत. त्यांच्याजवळ असण्यात माझं सारं सुख असतं. सेवाग्रामला जायला मी अधीर आहे.' बापू म्हणाले.

७

जगात केवळ निर्दोष असे काय आहे? भल्याबुऱ्याचे सर्वत्र मिश्रण आहे. आपण चांगल्याकडे बघावे. वाईटाकडे दुर्लक्ष करावे. गांधीजींच्याजवळ तीन माकडी बाहुल्या होत्या. एक माकड कानावर हात ठेवणारे, एक डोळ्यांवर हात ठेवणारे, एक ओठांवर हात ठेवणारे. वाईट ऐकू नको, वाईट पाहू नको, वाईट बोलू नको,– असे ती तीन चिनी माकडे सांगतात. महात्माजींचा हा आदर्श होता.

एकदा सरदार सेवाग्रामला आले होते. ‘लॉर्ड लिनलिथगो यांनी आपल्या भाषणाची एक प्रत आगाऊ तुमच्याकडं पाठवली होती असं वृत्तपत्रं म्हणतात. कशासाठी त्यांनी ती प्रत पाठवली होती? तुम्ही काही सूचना कराव्या, फेरफार सुचवावे म्हणून का?’ सरदारांनी बापूंना विचारले.

‘लिनलिथगोंचे ते भाषण म्हणजे खोटयाची खमंग काकडी आहे. त्यात फेरफार करायची, सूचना करायची सोयच नाही. ते भाषण एकदम फेकून देण्याच्या लायकीचं आहे.’ महात्माजी म्हणाले.

‘परंतु सर्व देवांना संतुष्ट करण्याची तुमची हातोटी और आहे.’ सरदार हसून म्हणाले. पुन्हा म्हणाले, ‘व्हाइसरॉयांच्या भाषणाबद्दल ज्या लेखात तुम्ही एक-दोन भले शब्द वापरले आहेत, त्याच लेखात जयप्रकाश आणि समाजवाद यांच्याबद्दलही चांगले उद्गार तुम्ही काढले आहेत.’

गांधीजी हसून म्हणाले, ‘हो. असं आहे खरं. माझ्या आईची ही शिकवण आहे. ती मला वैष्णव मंदिरात जायला सांगे, शंकराच्याही देवळात जायला सांगे, आणि गंमत सांगू का?- आमचं जेव्हा लग्न लागलं तेव्हा आम्हा दोघांना सर्व हिंदू मंदिरातील देवांच्या पूजेला नेण्यात आलं असं नाही, तर दर्ग्याच्या पूजेलाही आम्हांला नेण्यात आलं होतं.’

८

त्या वेळेस महात्माजी इंग्लंडमध्ये होते. १९३१ मधील ही गोष्ट आहे. महात्माजींच्या रक्षणासाठी म्हणा किंवा त्यांच्यावर देखरेख करण्यासाठी म्हणा एक गुप्त पोलीस नेहमी त्यांच्या वास्तव्याच्या जागी असे. गांधीजींचा उघडा व्यवहार, लपवाछपवी कसलीच नाही. सत्य सूर्यप्रकाशासारखे असते. ते अंधारात कधी लपून बसत नाही. सत्य निर्भय असते. त्याला लपायची इच्छाही नसते.

तो गुप्त पोलीस तेथे कंटाळला. कारण तेथे त्याला काम काहीच नसे. महात्माजींच्या कामात तोही मदत करू लागे. कधी सामानसुमान लावी, कधी इतर काही करी. प्यारेलालजींना, मीराबेनना तो म्हणायचा, 'मलाही काही काम द्या, संकोच नका करू.' तो गोरा गुप्त पोलीस बापूंचे थोडे तरी काम मिळावे म्हणून उत्सुक असे. काम मिळाले तर तो आनंदाने फुलून जाई.

लंडनमधील महात्माजींचे काम संपले. गोलमेज परिषदेसाठी ते गेले होते. हिंदुस्थानचा प्रश्न सोडवायला ते गेले होते. परंतु स्वातंत्र्याची वेळ आली नव्हती. ब्रिटिशांची कारस्थाने, हिंदी पुढाऱ्यांचे आपसातले मतभेद, हे सारे पाहून महात्माजी विटले.

सर्वांचा निरोप घेऊन ते हिंदुस्थानला परत यायला निघाले. आवराआवर झाली. लहान इंग्रज मुले महात्माजींभोवती घुटमळत होती.

इतक्यात एक बडा अधिकारी आला.

‘आपल्यासाठी आणखी काही करायला हवं आहे का? सारी सोय झाली ना? काही त्रास नाही ना पडला?’ त्याने विचारले.

‘सारं ठीक आहे. आणखी काही नको. मला एकच मागणं मागायचं आहे.’

‘कोणतं? मागा. संकोच का?’

‘हा जो इथं तुमचा गुप्त पोलीस असतो, त्याला माझ्याबरोबर ब्रिंडिसीपर्यंत येऊ दे. पाठवाल त्याला? नाही म्हणू नका.’

‘कशासाठी?’

‘तो आता माझ्या कुटुंबातलाच आहे. म्हणून येऊ दे तेथवर बरोबर.’

‘न्या तर मग.’

तो गोरा पोलीस फार आनंदला. ब्रिंडिसीपर्यंत तो महात्माजींच्या बरोबर गेला. तेथे त्याने प्रणाम केला. महात्माजींनी त्याचा पत्ता घेऊन ठेवला.

पुढे महात्माजी हिंदुस्थानात आले. ते आले तो येथे भडका उडालेला होता. भेटीसाठी व्हाइसरॉयसाहेबांना गांधीजींनी दोन

तारा केल्या. भेटीला साहेबाने नकार दिला. पुन्हा सत्याग्रह सुरू झाला. गांधीजींना येरवड्यात ठेवण्यात आले.

राष्ट्राचा सारा संसार शिरावर असणारे महात्माजी! परंतु ते त्या गोऱ्या गुप्त पोलीसाला विसरले नव्हते. त्यांनी त्याला एक घड्याळ भेट म्हणून पाठवले. त्याच्यावर त्यांनी 'प्रेमाची भेट' असे खोदवून खाली आपले नावही खोदवून घेतले होते.

ती प्रेमाची भेट मिळाल्यावर त्या इंग्रज गुप्त पोलिसाला केवढी कृतार्थता वाटली असेल!

९

सरदार वल्लभभाईंना गांधीजींविषयी अपार भक्तिप्रेम. १९३५ मध्ये त्यांनाही महात्माजींजवळ येरवड्यास ठेवण्यात आले होते. महात्माजींप्रमाणे ते खाऊ पिऊ लागले. ते चहा घेतनासे झाले. खजूर खाऊ लागले.

'बापू, खजुराच्या किती फोडी घेऊ?' ते विचारायचे.

'पंधरा.' बापू सांगायचे.

'वीस घेतल्या म्हणून काय बिघडलं? पंधरा नि वीस यात कितीसं अंतर?'

'तर मग दहाच पुरेत. दहा नि पंधरा यात तरी कितीसा

फरक ?' असे म्हणून महात्माजी मुक्तहास्य करीत. महात्माजींची सेवा करायची सरदारांना अनावर हौस, परंतु गांधीजी स्नान करून येतानाच कपडेही धुवून आणीत! तीही सेवा सरदारांना मिळत नसे. रात्री झोपायला जाताना सरदार बापूंच्या चरणांवर डोके ठेवून जायचे!

१९३२ मध्येच जातीय निवाडा बदलून घेण्यासाठी, अस्पृश्य स्पृश्यांपासून दूर केले जाऊ नयेत म्हणून गांधीजींनी तुरुंगात मरणांतिक उपवास आरंभिला. राजाजींना येरवड्यास आणण्यात आले. राजाजी सरदारांस म्हणाले, 'तुम्ही गांधीजींना उपवास नका करू म्हणून सांगा.' सरदार म्हणाले, 'त्यांच्याहून अधिक पवित्र पुरुष मी कुठं पाहिला नाही. त्यांना मी काय सांगणार? त्यांचा अंतरात्मा प्रमाण.'

सरदार गांधीजींना कितीदा म्हणायचे, 'आपण बरोबर मरू. तुमच्यामागं मला नका ठेवू.' परंतु बापू गेले! सरदार दुःख गिळून सहकाऱ्यांसह राष्ट्राचा गाडा आज संकटातून पुढे नेत आहेत!

१०

दक्षिण आफ्रिकेत सत्याग्रह सुरू होता. शेकडो सत्याग्रही तुरुंगात होते. त्यांच्या कुटुंबांची व्यवस्था टॉलस्टॉय फार्मवर

करण्यात आली होती. अनेक भगिनी आपली मुलेबाळे घेऊन तेथे राहत. महात्माजी कधी मोकळे असले म्हणजे या मायभगिनींना धीर द्यायचे. त्यांची कामेही करायचे.

एके दिवशी महात्माजी धुणी धुवायला निघाले. ते निरनिराळ्या भगिनींकडे गेले व म्हणाले, 'धुवायचे कपडे द्या आई. मी आणतो धुवून. नदी जरा लांब आहे. तुमची मुलं लहान. आणा सारा हगोली मुतोली. इतरही कपडे द्या. संकोच नका करू. तुमचे पती तिकडे सत्यासाठी तुरुंगात तपश्चर्या करीत आहेत. तुमची काळजी आम्ही घेतली पाहिजे. द्या. खरंच द्या.'

आणि ते शब्द ऐकून संकोचणाऱ्या मायबहिणी कपडे काढून देत. आणि त्यांचे भले मोठे गाठोडे बांधून, पाठुंगळीस घेऊन हा राष्ट्रपिता नदीवर जाई. तेथे ते सारे कपडे नीट धुवून उन्हात वाळवून, त्यांच्या घड्या घालून ते परत आणीत आणि मायबहिणींना देत. असे होते बापू! त्यांच्या सेवेला सीमा नाही.

११

लंडनला होते तेव्हा बापू. दरिद्रीनारायणचे प्रतिनिधी म्हणून ते गेले होते. ब्रिटिश सरकारच्या आमंत्रणावरून ते गेले होते.

ते स्वतःला ब्रिटिशांचा पाहुणा मानीत.

आणि बकिंगहॅम राजवाड्यातून राजाराणींच्या भेटीसाठी आमंत्रण आले. जावे की न जावे, बापूंसमोर प्रश्न पडला. तिकडे हिंदुस्थानात सरकारने जनतेवर शस्त्र धरले आहे. मी का इकडे बादशहांच्या भेटी घेत बसू? परंतु मी ब्रिटिशांचा पाहुणा आहे. मी व्यक्तिगत नात्याने आलो असतो तर बादशहांचे आमंत्रण नाकारले असते. परंतु आज मी त्यांचा पाहुणा म्हणून आहे. मला जायला हवे. मनात असा संघर्ष चालला आणि शेवटी बापूंनी जायचा निर्णय घेतला. परंतु त्यांनी ब्रिटिश अधिकाऱ्यांना कळविले :

'मी पोषाखात बदल करणार नाही. मी माझ्या नेहमीच्या पोषाखात येईन. चालत असेल तर कळवा.'

आणि 'चालेल' असे उत्तर आले. ब्रिटिश सम्राटाला भेटायला भारतीय जनतेचा हृदय-सम्राट पंचा नेसून गेला.

सामाज्याचा अभिमानी चर्चिल यामुळे संतप्त झाला होता. परंतु त्या पंचाचे अपार वैभव चर्चिलला काय कळे!

१२

गांधीजी त्या वेळेस येरवड्यास होते. कोणा तरी परकीयाने त्या वेळेस गांधीजींना पत्र लिहिले होते. तो परकी मनुष्य वयाने

लहान होता की मोठा? परंतु बहुधा तो बालक असावा. एरव्ही असा निर्मळपणा कोठे आढळेल?

त्या पत्रात काय होते, ते कोण सांगेल? ते पत्र आज उपलब्ध आहे की नाही माहीत नाही. परंतु दिल्लीच्या राजघाट येथील प्रदर्शनात त्या पत्राच्या वरचा लिफाफा ठेवलेला होता. त्या लिफाफ्यावरचा पुढील पत्ता वाचा नि सद्‌गदित व्हा.

TO

THE KING OF INDIA,

DELHI, INDIA

(अर्थ : हिंदुस्थानच्या राजाला; दिल्ली, हिंदुस्थान.)

असा पत्ता पत्रावर होता. आतील मजकुरावरून ते पत्र गांधीजींना उद्देशून लिहिलेले होते असे दिसले. म्हणून ते पत्र अखेर येरवड्यास आले. हिंदुस्थानचा राजा ब्रिटिशांच्या तुरुंगात होता. हिंदी जनतेचा खरा राजा इंग्लंडात नव्हता. पत्र पाठवणाऱ्या त्या अज्ञात व्यक्तीला भारताचा राजा म्हणजे महात्माजी असे वाटले! किती सत्यमय गोष्ट! इतर राजे येतील-जातील. परंतु या राजाचे सिंहासन भारतीयांच्याच नव्हे तर जगातील सर्व लोकांच्या हृदयात चिरंतन राहील. कारण सत्य आणि प्रेम यांवर ते सिंहासन उभारलेले आहे.

१३

बापूंना लहान मुलांचे फार वेड आणि मुलांचेही बापूजींवर फार प्रेम. सेवाग्रामला बापूजींची नातवंडं असायची. ती बापूंना सतवायची.

तो एक लहान दीड वर्षाचा नातू. तो गांधीजींच्या समोर उभा रहायचा आणि सारखा बापूजी, बापूजी अशा हाका मारायचा. गांधीजी ओ नाही द्यायचे. जवळची सारी ती गंमत पाहून हसू लागत.

गांधीजी १९४४ मध्ये सुटल्यानंतर शांतिनिकेतनला गेले होते. जवाहरलालजींची मुलगी इंदिरा तेथे होती. तिचा लहान मुलगा राजीव. गांधीजींना बघताच राजीव म्हणाला, 'जयहिंद!' आणि हृदय उचंबळून बापू त्याला म्हणाले, 'जयहिंद राजीव!'

एकदा सेवाग्रामला गांधीजी फिरायला गेले होते. फिरण्याच्या वेळेसही मुलाखती चालायच्या. गांधीजी दिल्लीला जाणार असे बोलण्यात येत होते. बरोबरच्या नातवाने प्रश्न केला :

'बापूजी तुम्ही दिल्लीला जाणार, होय ना?'

'हं बेटा.'

'का बरं जाता?'

'व्हाईसरॉयना भेटायला.'

‘नेहमी तुम्हीच त्यांना भेटायला जाता. ते व्हाइसरॉय तुम्हाला भेटायला का येत नाहीत?’

तो प्रश्न ऐकून सारे हसले आणि बापूजींनी त्या नातवाच्या पाठीवर थप्पड मारली!

बापू तेव्हा पाचगणीला होते. दादरचे मोतीवाले लागू मुलासह त्या वेळेस पाचगणीला गेले होते. एकदा गांधीजी फिरायला निघाले आणि लागूंचा मुलगा बरोबर होता. गांधीजींची काठी त्याने हातात घेतली. एक टोक त्याच्या हातात, दुसरे गांधीजींच्या- आणि तो पळू लागला. बापूही पळू लागले. त्या वेळचा तो फोटो अजरामर आहे.

‘नेत्याला नेणारा मुलगा’ असा तो फोटो तुम्ही पाहिला असेल.

आणि गांधीजी तेव्हा जुहूला होते. १९४४ नंतरचीच गोष्ट. प्रार्थना जुहूला होई. मुंबईहून हजारो लोक प्रार्थनेला जात. एके दिवशी एक मुलगा दादरहून पायी निघाला. फळे आणि फुले घेऊन निघाला आणि तो जुहूला आला. बापूंना तो भेटला. त्यांच्या पायी त्याने फुले वाहिली आणि फळे समोर ठेवली.

राष्ट्रपित्याने त्याला जवळ घेतले, त्याला आशीर्वाद दिला. बापूंचा परम मंगल हात पाठीवर फिरणे याहून अधिक थोर भाग्य ते कोणते?

१४

ते नौखालीतले दिवस. गांधीजी अश्रू पुसायला, धीर द्यायला गेले. सर्वत्र भीतीचे वातावरण. हिंदू घरांतून बाहेर पडत नव्हते. घरेदारे भस्म झालेली, माणसांच्या कत्तली झालेल्या, धर्माच्या नावाने अधर्माचे राज्य सुरू होते. त्या अंधारात प्रकाश द्यायला, त्या भीतीत अभय द्यायला राष्ट्रपिता निघाला. महात्माजींनी जंग जंग पछाडले. परंतु जनता बाहेर यायला धजेना. गांधीजींना क्षणभर निराश वाटले.

एके दिवशी त्यांच्याबरोबरच्या लोकांनी एक युक्ती केली. ते चेंडू वगैरे रस्त्यात खेळू लागले. घरातून मुले डोकावत होती. 'या बाळांनो, खेळायला या. बापूंबरोबर खेळायला या' असे बापूंचे लोक म्हणाले आणि ती मुले आली. खेळ म्हणजे मुलांचा आत्मा. ती खेळात रमली, धावू पळू लागली. हसू...खेळू लागली.

मग एके दिवशी तिरंगी झेंडा तेथे लावण्यात आला.

'या झेंडागीत म्हणू.' बापूंचे लोक म्हणाले.

आणि 'झंडा उँचा रहे हमारा' गीत गाण्यात आले.

'आता 'रघुपति राघव राजाराम' म्हणत चला आमच्याबरोबर. येता ना?'

'हो, हो; चला.'

आणि मिरवणूक सुरू झाली. मुले 'रघुपति राघव राजाराम' म्हणत निघाली. मुलांच्या पाठोपाठ घरांतून डोकावणारे मायबापही बाहेर पडले. कसं 'रामनाम घेतात ते बघू' असे धर्मवेडे मुसलमान म्हणायचे. परंतु ती बालकांची मिरवणूक, रामाच्या वानरसेनेची ती मिरवणूक बघून मुसलमान दिपून गेले. जयघोष करीत जाणाऱ्या त्या मिरवणुकीकडे ते बघतच राहिले. मारायला हात वर झाला नाही. त्यांचेही का हृदय उचंबळले होते? मुलाबाळांवर अपार प्रेम करणारे पैगंबर महंमद का त्यांच्याही हृदयात उभे राहिले?

त्या दिवशी गांधीजींच्या डोळ्यांतून कधी न येणारे दोन अश्रू आले. ते म्हणाले, 'आज अंधारात मला प्रकाश मिळाला, मला आशा मिळाली. निष्पाप मुलांच्या श्रद्धेचं हे बळ!'

विनोबाजी बाल शब्दाची व्युत्पत्ती बल ज्याच्याजवळ आहे तो बाल, अशी करतात ती उगीच नाही. प्रल्हाद, ध्रुव, चिलया, रोहिदास, इत्यादी भारतीय बाळांचा केवढा महिमा!

१५

१९२६ मधील ती गोष्ट. साबरमतीच्या आश्रमात बापूजी होते; आणि भारताचे ते थोर सेवक, दीनबंधू ॲण्ड्र्यूज तेही

त्या वेळेस तेथे होते. दीनबंधूंचे हृदय खरोखर दयासिंधू होते. दुसऱ्याचे दुःख पाहताच त्यांचे डोळे भरून यायचे. गांधीजीही प्रेमसागर. परंतु प्रसंगी ते कर्तव्यनिष्ठुर होत. कधी कधी कठोरपणे दिलेल्या नकारातच अपरंपार करुणा असते.

एकदा मलबारकडील एका कॉंग्रेस कमिटीचा चिटणीस बापूंकडे आला. त्याची कहाणी मोठी दुःखद होती. त्याने सार्वजनिक फंडातून बरेचसे पैसे लोकसेवेतच खर्च केले. परंतु हिशेब न ठेवल्यामुळे त्याला सारा जमाखर्च नीट मांडता येईना. हजार एक रुपयांची गोष्ट. त्याने स्वतःसाठी तर पैही खर्च केली नव्हती. परंतु स्थानिक कार्यकारिणीचे लोक म्हणाले,

'जमाखर्च मांडा. नाहीतर पैसे भरा.'

'एवढी रक्कम मी कुठून देऊ?'

'आम्ही काय सांगणार? सार्वजनिक पैशांचा हिशोब चोख हवा.'

'मी बापूंकडे जातो. त्यांनी जर सूट दिली तर मानाल ना?'

'हो, मानू.'

आणि तो चिटणीस बापूजींकडे आला. त्याने सारी हकीकत सांगितली. तो म्हणाला :

'बापू, मी शाळेची नोकरी सोडून सेवेला वाहून घेतलं. मी एक पैही स्वतःसाठी वापरली नाही.'

'ते खरं असेल. परंतु तुम्ही पैसे भरले पाहिजेत. सार्वजनिक कार्यात व्यवस्थितपणा हवा.'

'परंतु आता मार्ग काय?'

'मार्ग एकच. पैसे भरण्याचा.'

तो तरुण रडू लागला. जवळच दीनबंधू होते. ते कळवळले.

'बापू, पश्चात्ताप झालेल्या माणसाला असं कठोर नका बोलू.' ते म्हणाले.

'त्याला पश्चात्ताप नुसता मनात होऊन काय उपयोग? झालेली चूक निस्तरली तरच तो खरा पश्चात्ताप असं म्हणता येईल. ते काही नाही. ता तरुणानं स्वतःची चूक सुधारली पाहिजे. जनसेवक आहे तो.'

१६

मागच्या गोष्टीतील तो तरुण सेवक. याची गोष्ट आणखी पुढे सांगतो.

त्या तरुण काँग्रेस कार्यकर्त्याला गांधीजींचे कठोर बोलणे पटले. मनात दुःख त्याला झालेच. तरी पण त्या कठोर भाषणाच्या मागे दडून राहिलेले तत्त्व त्याला पटले. तो तेथून उठला नि जड पावलांनी जाण्यास निघाला. हृदयात धडधडत होते. पावले जड

पडत होती. भविष्यकाळ अंधाराने भरल्यासारखा दिसत होता. तो दरवाजापर्यंत तर गेलाच, पण उंबरठ्यावरून त्याची पावले पुन्हा मागे वळली. तो गांधीजींजवळ येऊन बसला आणि चाचरत म्हणाला :

'बापू तुमचा उपदेश पटला मला. पण मी कंगाल आहे. खिशात दमडीही नाही. कसेबसे पैसे मिळवून इथपर्यंत तर आलो. आता परत कसा जाऊ? परत जायला काहीही करून पस्तीस रुपये द्या. मी ते शक्य तेवढ्या लौकर परत करीन.'

बोलणे संपवून तो बापूंजवळ मान खाली घालून बसला. डोळ्यांतून अश्रू वाहत होते. बापूंनाही वाईट वाटले. पण ते म्हणाले :

'माझ्याकडं काहीही मिळणार नाही. अगोदरच एक हजार रुपयांची जबाबदारी घेऊन बसला आहेस. त्यात ही आणखी भर नको. नवीन आयुष्य तुला सुरू करायचं आहे ना? तर मग नवीन आयुष्याची सुरुवात कर्ज काढून नको करू. निराळा मार्ग काढ. त्यातच तुझं हित आहे.'

तो तरुण उठला. हा त्याला दुसरा धक्का होता. एक हजार रुपयांची सोय तर लावायची होतीच. तो बाहेर जाऊ लागला. पण त्याच्या चेहऱ्यावर नव्या आयुष्यात एक नवीनच तेज दिसत होते. काहीशा आत्मविश्वासाने तो बाहेर पडला.

त्याच्या पाठोपाठ दीनबंधू ॲण्ड्र्यूजही गेले. त्यांनी त्या तरुणाला तिकीट काढून दिले. दीनबंधू आश्रमात परत आले. त्यांना हसू येत होते. बापू हसून म्हणाले, 'कळली तुमची लबाडी. उगीच का दीनबंधू नाव पडलं तुम्हाला?'

१७

१९३० साली महात्माजी सत्याग्रह सुरू करणार होते. कशाचा सत्याग्रह करणार ते अजून त्यांनी निश्चित केले नव्हते. रवींद्रनाथ त्या ३० सालच्या आरंभी साबरमती आश्रमात आले होते.

'महात्माजी, सत्याग्रह कोणत्या स्वरूपात करणार?' त्यांनी विचारले.

'मी रात्रंदिवस विचार करीत आहे. अजून प्रकाश नाही मिळाला.' बापू म्हणाले. आणि पुढे बापूंच्या डोळ्यांसमोर मीठ आले. दादाभाई नौरोजींनी ५० वर्षांपूर्वी लिहून ठेवले होते की, जर मिठाच्या बाबतीतील अन्याय जनतेस कळेल तर ती बंड करून उठेल. मीठ तयार करण्याला जो खर्च येतो त्याच्या शेकडो पट त्याच्यावर सरकारचा कर. बंगालमध्ये विलायती मीठ बाजारात. मद्रास इलाख्यातील मिठागरे नष्ट झाली. मद्रास प्रांतात खूप गरिबी. समुद्रकाठच्या लोकांना मीठ घ्यायलाही

दिडकी नसे. परंतु पोटात मीठ नाही गेले तर कसे व्हायचे! गुरांच्या अंबोणातही आपण मीठ घालतो. मद्रासकडचे आपले गरीब बंधू रात्रीच्या वेळेस समुद्रकाठी जाऊन मिठाचा अंश पोटात जावा म्हणून जमीन चाटीत. समुद्रकाठी आपोआप तयार होणारे मीठ मातीत मिसळण्यासाठी ब्रिटिश सरकारने नोकर ठेवले होते. अन्नात माती कालवणे हे केवढे पाप!

अशा या मिठाकडे राष्ट्रपित्याची दृष्टी गेली. मिठाचा सत्याग्रह हा शब्द हिंदुस्थानभर गेला. सत्याग्रहाचा नवीन शब्द, कायदेभंगाचा नवीन शब्द चुलीजवळ गेला. मायभगिनी सत्याग्रह करायला निघाल्या.

३० सालचा तो लढा अपूर्व झाला. मिठाचा सत्याग्रह, जंगल सत्याग्रह, करबंदी– अशा रीतीने लढा वाढत गेला. परंतु सर्वांत बहार केली वानरसेनेने. हिंदुस्थानभरची मुले मुली राष्ट्रीय लढ्यात सामील झाली. सकाळ-संध्याकाळ राष्ट्रीय गाणी म्हणत हिंदुस्थानभर बाल-बालिकांच्या सेना फिरू लागल्या रामाचे वानर, शिवबाचे मावळे, तसे बापूंचे ते बाळ. सर्व राष्ट्राला या तेजस्वी मुलांनी देशभक्तीची दीक्षा दिली. लहान मुलांनी लाठ्या खाल्ल्या. कल्याणला आठ वर्षांची एक मुलगी लाठीमाराने बेशुद्ध होऊन पडली.

बापू सुटले, सत्याग्रह थांबला. ते उचंबळून म्हणाले, ‘ईश्वरावर

विसंबून मी चळवळ सुरू केली होती. परंतु लहान मुलं अशी उठतील, वानरसेना देशभर उभ्या राहतील, याची मला कल्पनाही नव्हती. लहान मुलांची निष्पाप साधना, तिच्यात अपार सामर्थ्य असते. प्रभूची कृपा. त्यांच्याच हाती ही चळवळ होती. त्यानेच सर्वांना प्रेरणा दिली.'

१८

दुसरे महायुद्ध सुरू झाले होते. युरोपातील राष्ट्रे भराभरा कोलमडत होती. इंग्लंड संकटात होते. त्या पहा वसाहतीतून फौजा येऊ लागल्या. इंग्लंडमध्ये उतरू लागल्या. एक ऑस्ट्रेलियन सेना मुंबईत उतरली. ती विलायतला जायची आहे.

रणांगणावर मरायला जाणाऱ्या शिपायांना सारी मोकळीक असते. आणि गुलाम हिंदुस्थानात गोऱ्या शिपायांच्या मिजाशीला सीमा नसे. ऑस्ट्रेलियन सैनिक, ते गोरे टॉमी, मुंबईत धुमाकूळ घालू लागले. कोणाच्या व्हिक्टोरियात बसून जात, कोणाची मोटार पकडीत. परंतु सर्वांत वाईट गोष्ट म्हणजे त्यांची स्त्रियांच्या बाबतीतील वागणूक. गिरगाव, गॅटरोड वगैरे भागांतून हिंदी नारींना हिंडणे कठीण होऊ लागले. टॉमी चावटपणा करायचे. पदरही म्हणे ओढायचे. परंतु मुंबईतील वृत्तपत्रे गप्प होती.

महाराष्ट्रातील हिंदुत्वाची अभिमानी पत्रेही थंड होती. अखेर गोष्टी राष्ट्रपित्याच्या कानी गेल्या आणि तो शांतिसिंह प्रक्षुब्ध झाला. हरिजनमध्ये बापूजींनी लिहिले, 'लष्करी अधिकारी कुठं आहेत? गव्हर्नर काय करीत आहेत? मुंबईचे मेयर कुठं गेले? काँग्रेस कमिटी का झोपली? हिंसा किंवा अहिंसा हा सवाल नाही. स्त्रियांच्या अब्रूचं रक्षण झालंच पाहिजे.' महात्म्याने आपला निर्भय आवाज उंच केल्याबरोबर मग इतर पत्रे रकाने भरून लिहू लागली. महात्माजी म्हणजे निर्भयता.

१९

महात्माजींनी प्रयत्नपूर्वक स्वतःच्या जीवनातून भीती घालविली होती. लहानपणी अंधारातून जायला भिणारा हा मोहनदास पुढे मूर्तिमंत निर्भयता झाला. एकदा साबरमतीच्या आश्रमात बसले असता त्यांच्या मांडीवर साप पडला. गांधीजी त्याच्याकडे बघत होते. तो का बापूजींच्या मांडीवर क्षणभर लोळायला आला होता? प्रेमामृताची गोडी चाखायला आला होता? ज्याला सर्व विश्वात परमेश्वर दिसतो त्याला कोणापासून कशाचे भय?

एकदा एकाने गांधीजींना प्रश्न केला, 'गांधीजी, समोरून वाघ आला तर काय कराल?'

‘मी निःशंकपणं त्याच्या अंगावरून निघून जाईन. माझ्या बाबतीत काय करायचं ते वाघानं ठरवावं.’ बापू म्हणाले.

२०

‘चले जाव’ लढा सुरू होता. बापूजी, कस्तुरबा, महादेवभाई प्यारेलाल, डॉ. गिल्डर, डॉ. सुशीला नायर, देवी सरोजिनी इत्यादी मंडळी पुण्याला आगाखान राजवाड्यात स्थानबद्ध होती.

श्री. महादेवभाई तर १५ ऑगस्टलाच देवाघरी गेले. तुरुंगात जाऊन आठवडाही झाला नव्हता. बा आणि बापू यांच्या हृदयावर तो कठोर आघात होता. परंतु दःख गिळून सारी राहत होती.

तुरुंगातील वेळ तरी कसा जायचा? कस्तुरबा, डॉ. गिल्डर व इतर मंडळी कधी रात्री कॅरम खेळत. बांना कॅरम फार आवडे. त्या खेळतही छान.

बापूही निरनिराळे खेळ खेळायचे. बॅडमिंग्टन, पिंगपाँग खेळायचे. बापू पिंगपाँग खेळायला प्रथम ज्या दिवशी आले त्या दिवशी ते लहान बॅटीने चेंडू परतवणार तो त्यांच्या डोक्यावर आपटूनच तो परत गेला. सर्वांना हसू आले.

एकदा गमतीदार पोषाख करायचे असे ठरले. डॉ. गिल्डर यांनी बलुची पठाणाचा वेष घेतला. बापूंना हसू आवरेना.

'डॉ. गिल्डरांचा वाढदिवस आला तेव्हा हातरुमालावर स्वतःच्या हाताने नाव भरून बापूजींनी त्यांना तो रुमाल भेट दिला. राष्ट्राला मुक्त करणारा महात्मा आगाखान पॅलेसमध्ये भरतकामही करी!

परंतु एक गोष्ट मला उचंबळविती झाली. बांचेही जवळजवळ ७० वय. बापूंची सत्तरी संपलेली. वेळ जावा म्हणून बापू कस्तुरबांना भूगोल शिकवीत. पू. विनोबाजी म्हणायचे, 'भूगोलासारखा रसाळ विषय नाही.' भारताचा तात वृद्ध कस्तुरबांना तुरुंगात भूगोल शिकवीत आहे, हे दृश्य डोळ्यांसमोर येऊन मी सद्‌गदित होतो. मधुर, मंगल, सहृदय दृश्य!

२१

लोकमान्य टिळकांबद्दल महात्माजींना अपार आदर. परंतु त्यांनाही नम्रपणे परंतु निर्भयपणे सांगायला महात्माजी कचरत नसत. १९१७ मधील गोष्ट. कलकत्त्याला राष्ट्रीय सभेचे अधिवेशन भरले होते. डॉ. ॲनी बेझंटबाई अध्यक्ष होत्या. अधिवेशनाच्या निमित्ताने इतरही जाहीर सभा होत. पुढाऱ्यांची भाषणे होत.

ती पहा एक प्रचंड सभा भरली आहे. हजारो लोक जमले

आहेत. लोकमान्य टिळक, गांधीजी अशी थोर मंडळी तेथे आहेत. लोकमान्यांचे भाषण झाले, ते इंग्रजीत बोलले. नंतर गांधीजी उठून म्हणाले, 'लोकमान्यांचं सुंदर, स्फूर्तिदायक भाषण हिंदीमधून झालं असतं तर बहुतेकाना समजलं असतं. हे इंग्रजी भाषण फारच थोड्यांना कळलं असेल. भाषण ज्यांना कळलं नाही त्यांनी हात वर करा बघू.' हजारो हात वर झाले. गांधीजी लोकमान्यांना म्हणाले, 'या जनतेला कळेल असं नको का व्हायला?'

आणि लोकमान्य पुन्हा उभे राहिले. जनता हेच त्यांचेही दैवत होते. लोकमान्यांनी हिंदीचा अभ्यास केलेला नव्हता. तरीही मोडक्यातोडक्या हिंदीत ते बोलले. लोकांची तोंडे फुलली. महात्माजींना अपार आनंद झाला. खरी राष्ट्रीयता, खरे राष्ट्रैक्य तेथे जन्मत होते.

साने गुरुजी वाङ्मय

सुंदर पत्रे : भाग १ ते ३
कुमारांपुढील कार्य
नवा प्रयोग
माझी दैवते
जीवनाचे शिल्पकार
लोकमान्य टिळक
आपले नेहरू
भारतीय नारी

श्यामची आई
शबरी
मुलांसाठी फुले
सुंदर कथा
तीन मुले
हिमालयाची शिखरे
ना खंत ना खेद
मिरी
आपण सारे भाऊ
स्वर्गीय ठेवा
विश्वभारती
गोड गोष्टी भाग (१ ते १०)

: साधना प्रकाशने

भगवान श्रीकृष्ण
मोरी गाय
दिगंबरराय
श्री शिवराय
कावळे
साक्षरतेच्या कथा
दारुबंदीच्या कथा

: इतर प्रकाशने

गोप्या
दुर्दैवी
नवजीवन
अमोल गोष्टी
कुरल
विश्राम
रामाचा शेला
गीता हृदय
श्याम
भारताचा शोध
विचार-गाथा
विश्वदर्शन